## MAHARASHTRA ACT No. XLIV OF 1977

### THE MAHARASHTRA TAXATION LAWS OFFENCES (EXTENSION OF PERIOD OF LIMITATION) ACT, 1977.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ६ ऑक्टोबर १९७७ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,
अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLIV OF 1977

### AN ACT TO PROVIDE FOR EXTENSION OF PERIOD OF LIMITATION FOR TAKING COGNIZANCE OF OFFENCES UNDER CERTAIN TAXATION LAWS OF THE STATE OF MAHARASHTRA.

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १३ ऑक्टोबर १९७७ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

## सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४.

### महाराष्ट्र राज्याच्या विवक्षित कराधानविषयक कायद्यांखाली अपराधांची दखल घेण्यासाठी मुदत मर्यादा वाढवण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम

**ज्याअर्थी,** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम ४६८ मध्ये अपराधांची दखल घेण्यासाठीची मुदत मर्यादा विहित केलेली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्याच्या विवक्षित कराधानविषयक कायद्यांखालील अपराधांना लागू असलेली मुदत मर्यादा वाढवण्याकरिता व त्यांची आनुषंगिक बाबींकरिता, तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठाविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कराधान विधी अपराध (मुदत मर्यादा वाढवणे) अधिनियम, १९७७ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अंमलात येईल.

महाराष्ट्र राज्याच्या विवक्षित कराधान विधींखालील अपराधां-करिता वाढविलेली मुदत मर्यादा.

२. (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याचे कलम ४६८, पोट-कलम (२) मध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही अधिनियमांखाली शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध किंवा कोणतेहि? अशा अपराधाबरोबर ज्याची न्यायचौकशी करता येईल अशा संहितेच्या उपबंधान्वयेचा इतर कोणताही अपराध यांची दखल घेण्यासाठीची मुदत मर्यादा एक वर्ष सहा महिने असेल.

(२) पोट-कलम (१) द्वारे अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून, उक्त संहितेच्या प्रकरण छत्तीसचे उपबंध, ज्याप्रमाणे उक्त संहितेच्या कलम ४६८ मध्ये उल्लेख केलेल्या इतर अपराधांना ते लागू होतात त्याचप्रमाणे, ते पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या अपराधांची दखल घेण्यासाठी लागू होतील.

## अनुसूची

(कलम २ पहा)

१. मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (सन १९५८ चा मुंबई अधिनियम ६५).

२. मुंबई मोटार वाहन (उतारूंवर कर आकारणी) अधिनियम, १९५८ (सन १९५८ चा मुंबई अधिनियम ६७).

३. महाराष्ट्र (रस्त्यावरून वाहून नेण्यात येणाऱ्या) मालावरील कर अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ३३).

(यथार्थ अनुवाद)

य. शं. कानिटकर,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.